# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः22.06.2024** **वारःशनिवार**

---

1. दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन जगभरात मोठ्या उत्साहात साजरा.
2. तूरडाळ, हरभरा डाळीच्या साठवणुकीच्या मर्यादेवर केंद्र सरकारचे निर्बंध
3. 18 व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा दिमाखदार सोहळ्यानं समारोप
4. स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार आणि अनियमिततेला आळा घालण्यासाठी कायद्यात कडक शिक्षेची तरतूद आणि
5. केरळमधल्या 6 जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीची शक्यता

**<u>योग दिन</u>**

दहावा आंतरराष्ट्रीय योग दिवस काल जगभरात मोठ्या उत्साहानं साजरा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत योग दिनाचा मुख्य कार्यक्रम जम्मू आणि काश्मीर मधील श्रीनगर इथं शेर-ए-काश्मीर आंतरराष्ट्रीय परिषद केंद्रात संपन्न झाला. यावेळी मोदी यांनी आपल्या भाषणात शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक प्रगतीमध्ये योगाभ्यासाचे महत्त्व स्पष्ट केले. योगाभ्यास ही आत्मोन्नतीचे सर्वोत्तम साधन असल्याचं आपल्या भाषणात नमूद केलं. योग ही जगभरातील विविध संस्कृतीतील आणि विविध पार्श्वभूमी असलेल्या लोकांना एकत्र आणणारी शक्ती असल्याचं मोदी म्हणाले. योगाभ्यासामध्ये तरुण पिढी मोठ्या उत्साहाने आणि निष्ठेने सहभागी होत असल्याचं पाहून आनंद वाटत असल्याचं ही त्यांनी नमूद केलं. यासंदर्भात, काल समाज माध्यमावर प्रसारित केलेल्या संदेशात मोदी म्हणाले की, दहावा आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभरात मोठ्या प्रमाणावर साजरा केला गेला. योगाभ्यासामध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींचे, समुदायाचे आणि संस्थांचे त्यांनी आभार मानले. योगाभ्यासाला प्रसिद्धी देण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या सर्वांचे त्यांनी यावेळी आभार मानले. हे प्रयत्न एकजूट आणि परस्पर सौहार्द भावना वाढीस लागण्यासाठी दीर्घकाळ परिणामकारक ठरतील अशी भावना पंतप्रधानांनी यावेळी बोलताना व्यक्त केली. योग क्षेत्रातील प्रशिक्षकांची वाढती संख्या पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. अशा प्रशिक्षकांमुळेच इतरांना योगाभ्यासाठी प्रेरणा मिळत असल्याचं त्यांनी सांगितलं. येत्या काळात योगच्या माध्यमातून जग जवळ येईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

**<u>तुरडाळ</u>**

केंद्र सरकारनं तूर डाळ, हरभरा आणि काबुली चण्याच्या साठवण मर्यादेवर निर्बंध घातले आहेत. साठेबाजी आणि अवैध कारभार रोखण्यासाठी तसंच ग्राहकांना रास्त किमतीत डाळी उपलब्ध व्हाव्यात या हेतूनं हे पाऊल उचललं असल्याचं सरकारनं सांगितलं. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयांनं यासंदर्भात आदेश जारी केला असून किरकोळ आणि घाऊक विक्रेते, मोठ्या विक्री साखळीतील विक्रेते, गिरणी

व्यावसायिक आणि आयात करणारे व्यापारी या सर्वांना तो लागू आहे. या आदेशानुसार घाऊक विक्रेत्यांना 200 मेट्रिक टन, किरकोळ विक्रेत्यांना 5 मेट्रिक, किरकोळ विक्री दुकांनात 5 मेट्रिक टन आणि मोठ्या विक्री साखळीतील दुकानं 200 मेट्रिक टन मर्यादेपर्यंत साठा करू शकतात. ही साठा मर्यादा 30 सप्टेंबर 2024 पर्यन्त लागू असेल.

**<u>आकाशवाणी</u>**

आकाशवाणीनं विश्वासार्ह बातम्या देण्याची ओळख जपली आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या रॉयटर्स इन्स्टिट्यूट फॉर स्टडी ऑफ जर्नालिझमच्या ताज्या वार्षिक सर्वेक्षणात आकाशवाणीच्या बातम्यांच्या विश्वासार्हतेच्या बाबतीत असलेल्या अग्रगण्य स्थानावर शिक्कामोर्तब केलं आहे. कोणत्याही परिस्थितीत विश्वसनीय आणि वास्तव बातम्या देण्याच्या आकाशवाणीच्या अतूट वचनबद्धतेचं हे द्योतक आहे, असं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांनी याबद्दल प्रतिक्रिया देताना सांगितलं. सेहगल यांनी काल दिल्लीतील आकाशवाणीच्या कार्यालयात झालेल्या योगदिन कार्यक्रमात सहभाग नोंदवला. यावेळी आकाशवाणीच्या महासंचालक मौशुमी चक्रवर्ती याही उपस्थित होत्या

**<u>जीएसटी बैठक</u>**

अर्थमंत्री निर्मला सितारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्ली इथं वस्तु आणि सेवा कर परिषदेची 53 वी बैठक होणार आहे. नव्याने सत्तास्थापना झाल्यानंतर जीएसटी संदर्भात होणारी ही पहिलीच बैठक आहे. यापूर्वीची बैठक गेल्या वर्षी 7 ऑक्टोबरला झाली होती त्यावेळी परिषदेनं अनेक निर्णय घेतले होते. वस्तु आणि सेवा कर परिषदेनं वस्तु आणि सेवा कर लवाद मंडळाच्या अध्यक्ष आणि सदस्य निवडीसंदर्भात पात्रता आणि वयाच्या निकषांसंदर्भात कायद्यात तरतूद करण्याची सूचना मांडली होती. भरड धान्य पिठापासून तयार केलेल्या अन्न पदार्थांवर शून्य कर आकारणी करावी अशी मागणीही परिषदेनं केली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना थकबाकीतून दिलासा देण्यासाठी जीएसटी 28 टक्क्यावरून 5 टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा तसचं पशुखाद्याच्या निर्मिती किमतीत घट करण्याचा निर्णयही परिषदेनं घेतला आहे.

**<u>शेख हसीना</u>**

बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना भारत भेटीवर आल्या असून काही वेळापूर्वी राष्ट्रपती भवनात त्यांचं औपचारिक स्वागत करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शेख हसीना यांच्यात विविध विषयांवर आज द्विपक्षीय चर्चा होणार आहे.

**<u>मिफ समारोप</u>**

18 व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा काल मुंबईत एका दिमाखदार सोहळ्यात समारोप झाला. यावेळी 'The Golden Thread' या माहितीपटाला आंतरराष्ट्रीय श्रेणीत सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ अभिनेत्री पूनम धिल्लन यांनी चित्रपटाच्या दिग्दर्शिका निशिता जैन यांना सुवर्ण शंख, 10 लाख रुपये आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. विविध श्रेणीत सर्वोत्कृष्ट ठरलेल्या लघुपट आणि माहितीपटांनाही यावेळी गौरवण्यात आलं. या महोत्सवात सहभागी झालेल्या चित्रपटांची संख्या आणि प्रेक्षकांचा मिळालेला प्रतिसाद लक्षणीय होता असं महोत्सवाचे संचालक पृथूल कुमार यांनी सांगितलं. या महोत्सवाला सहाय्य करणाऱ्या

चित्रपट प्रेमींचे, परीक्षकांचे, केंद्र आणि महाराष्ट्र शासनाचे त्यांनी आभार मानले. 'इंडिया इन अमरीतकाल' या विशेष विभागात एडमन रॅनसन दिग्दर्शित लाइफ इन लूम या लघुपटाला सर्वोत्तम लघुपटाचा पुरस्कार मिळाला. तर श्रीमयी सिंग यांना 'अँड टूवर्ड्स हॅप्पी अलाइज' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ठ नवोदित दिग्दर्शकाचा दादासाहेब फाळके चित्रनगरी पुरस्कार मिळाला. या समारोप कार्यक्रमाला महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगुंटीवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**<u>केंद्र-सार्वजनिक परीक्षा कायदा</u>**

स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार आणि अनियमिततेला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारनं एक कडक कायदा लागू केला आहे. या कायद्यात गुन्हेगारांना जास्तीत जास्त 10 वर्षांचा तुरुंगवास आणि 1 कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. कायद्यातील या तरतुदी आजपासून लागू होतील असं कार्मिक मंत्रालयाने राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे कळवलं आहे. 'सार्वजनिक परीक्षांमधील अयोग्य माध्यमांचा प्रतिबंध विधेयक, 2024' हे लोकसभेने आणि राज्यसभेने अनुक्रमे 6 आणि 9 फेब्रुवारी रोजी मंजूर केलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 12 फेब्रुवारी रोजी विधेयकाला मंजुरी देऊन त्याचं कायद्यात रूपांतर केलं. केंद्रीय लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग, नॅशनल टेस्टिंग एजन्सी NTA, रेल्वे भरती आणि बँकिंग भरती परीक्षा अशा विविध सार्वजनिक परीक्षांमध्ये होणाऱ्या अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे.

**<u>NIA</u>**

मानवी तस्करी आणि जबरदस्तीच्या सायबर फसवणूकी मधील आंतरराष्ट्रीय संबंध असलेल्या एका मोठ्या प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्थेनं काल 2 परदेशी नागरिकांसह 5 आरोपींवर आरोपपत्र दाखल केलं. मुंबईतल्या एनआयए च्या विशेष न्यायालयात दाखल केलेल्या आरोपपत्रानुसार या प्रकरणात अनेक परदेशी नागरिकांचा सहभाग असल्याचं उघड झालं आहे. एनआयए ने सुरू केलेल्या तपासानुसार, आरोपींनी संगणक आणि इंग्रजी भाषेत प्रवीण असलेल्या भारतीय तरुणांना लक्ष्य करून त्यांना आर्थिक लाभासाठी पर्यटक व्हिसावर फसव्या कॉल सेंटरमध्ये काम करायला भाग पाडलं. आणि संबंधित पीडितांना भारतातून भरती करून थायलंडमार्गे लाओ पीडीआर मधील गोल्डन ट्रँगल इथल्या SEZ मध्ये हस्तांतरित केलं. तिथे त्यांना फेसबुक, टेलिग्राम, क्रिप्टोकरन्सीच्या मूलभूत गोष्टी हाताळणी आणि घोटाळ्यात सहभागी कंपनीने तयार केलेले ॲप्स हाताळण्याचं प्रशिक्षण देण्यात आलं.

**<u>फुटबॉल</u>**

बर्लिनमधील ऑलंपिया स्टेडियन इथे झालेल्या यूरो करंडक 2024 स्पर्धेत ड गटातील सामन्यात ऑस्ट्रीयानं पोलंडचा 3-1 असा पराभव केला. या पराभवामुळं पोलंडच्या पुढच्या फेरीसाठी पात्र होण्याच्या आशा धुळीला मिळाल्या आहेत. याआधी ड गटातील नेदारलँड्स कडून त्यानं पराभव पत्करावा लागला होता.

**<u>केरळ अलर्ट</u>**

हवमान विभागानं केरळमधल्या 6 जिल्ह्यांमध्ये नारंगी बावटा जारी केला असून तिथे अतिवृष्टीची शक्यता आहे. या जिल्ह्यांमध्ये डोंगराळ वायनाड आणि इडुक्की याशिवाय मलप्पुरम, कोझिकोड, कन्नूर आणि कासारगोड यांचा समावेश आहे. उद्या, कोझिकोड, वायनाड आणि कन्नूर जिल्ह्यांसाठी अत्यंत मुसळधार पावसाचा इशारा

देणारा लाल बावटाही जारी करण्यात आला असून या काळात इडुक्की, एर्नाकुलम, त्रिशूर, मलप्पुरम, पलक्कड आणि कासारगोडसाठी नारंगी बावटा जारी आहे. केरळच्या अनेक किनारी भागात उंच लाटांचा इशारा दिला आहे. लक्षद्वीपच्या अगाट्टी, अमिनी, एंड्रोथ, कावरत्ती आणि मिनिकॉय बेटांवरही असाच इशारा जारी करण्यात आला असून  मच्छीमारांनी समुद्रात न जाण्याचा सल्ला दिला आहे.

**अंबुबाची मेळा**

आसाममध्ये आजपासून प्रसिद्ध कामाख्या मंदिरात अंबुबाची मेळा सुरू झाला आहे. 26 जून रोजी याची सांगता होणार असून अंबुबाची मेळ्यासाठी देशभरातून आलेले लाखो भाविक जमले आहेत. कामाख्या देवीची, प्रजनन आणि स्त्रीत्वाचं प्रतीक असलेली वार्षिक मासिक पाळी साजरी करण्यासाठी हा उत्सव साजरा केला जातो. उत्सवादरम्यान, कामाख्या मंदिराचे दरवाजे बंद राहतील. 25 जून रोजी रात्री 9 वाजून 8 मिनिटांनी मंदिराचे दरवाजे पुन्हा उघडतील. कामरूप मेट्रो जिल्हा प्रशासनाने आलेल्या भाविकांसाठी चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे.

**हवामान**

हवमान अंदाज केरळसोबतच, कर्नाटकाचा दक्षिण मध्य आणि किनारी भाग, कोकण आणि गोव्यामध्ये पुढील पांच दिवस मुसळधार ते अति मुसळधार स्वरूपाचा पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.